MHBI030029852022

फौजदारी किरकोळ अर्ज क्र.९७१/२०२२
यशवंत वि. मुख्याधिकारी
(CNRNo.MHBI030029852022)

:: निशाणी क्र.१ वरील आदेश ::

सदरचा अर्ज जन्म-मृत्यु नोंदणी कायदा, १९६९ चे कलम १३(३) प्रमाणे अर्जदाराच्या जन्माची नोंद होवुन मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे असे कथन आहे की, अर्जदाराचा जन्म दिनांक ०१-०१-१९६७ रोजी कुंभारी, ता.जी.बीड येथे राहते घरी येथे राहते घरी झालेला आहे. परंतु, अर्जदाराचा जन्म राहते घरी झालेला असल्याने जन्माची नोंद राहुन गेलेली आहे. अर्जदाराच्या जन्म नोंद प्रमाणपत्राची शासकिय व निमशाकीय कामासाठी गरज भासली आहे. सबब, सदरचा अर्ज दाखल केला.

३. सदर अर्ज दाखल झल्यानंतर गैरअर्जदारास नोटीस पाठविण्यात आली होती. सदर नोटीस (निशाणी क्र.७) गैरअर्जदाराला दिनांक २१-१०-२०२२ रोजी तामील होवुन देखील गैरअर्जदार सदर प्रकरणात हजर झाले नाहीत.

४. अर्जदारांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदाराने अर्जाच्या अनुषंगाने स्वतःचे शपथपत्र निशाणी क्र.११, ग्रामपंचायत कार्यालय, कुंभारी ता.जि.बीड यांनी दिलेले जन्म/मृत्यु नोंद अनउपब्धता प्रमाणपत्र निशाणी क्र.५, अर्जदाराचे स्वतःचे आधार कार्डची पडताळणी प्रत व पॅन कार्डची पडताळणी प्रत दाखल केलेल्या आहेत.

५. कलम १३(३) नुसार जन्माच्या किंवा मृत्युचा तपशील बरोबर असल्याची खातरजमा करुन पाहिल्यानंतर तशी नोंद करता येते. अर्जदाराने दाखल केलेले कागदपत्रे व पुराव्याचे अवलोकन केले असता, अर्जदाराचा जन्म दिनांक ०१-०१-१९६७ रोजी झाल्याचे दिसुन येते. तसेच ग्रामपंचायत कार्यालय, कुंभारी यांनी दिलेल्या जन्म/मृत्यु नोंद अनउपलब्धता प्रमाणपत्रानुसार अर्जदाराचे जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, कुंभारी ता.जि.बीड येथील नोंदणी अभिलेखामध्ये शोध घेतला असता अभिलेखामध्ये त्यांच्या जन्माची नोंद आढळुन

आली नाही. एवढेच नसुन दिनांक १८-१०-२०२२ रोजी दैनिक अभिमान या वृत्तपत्रात जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात आले. परंतु मुदतीत कोणाचाही आक्षेप आला नाही.

६. वरील सर्व परिस्थितीचा व कागदपत्रांचा विचार करता, अर्जदार याचे तोंडी पुराव्यास कागदपत्राने पुष्टी दिलेली आहे. त्यानुसार, अर्जदार नामे यशवंत पि. आबाराव भालेराव यांच्या जन्माची नोंद होणे आवश्यक आहे. म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करते.

:: आ दे श ::

१ सदरचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२ ग्रामसेवक तथा जन्म-मृत्ये निबंधक, ग्रामपंचायत कार्यालय, कुंभारी, ता.जि.बीड तथा संबंधीत अधिकारी यांनी अर्जदार नामे यशवंत पि. आबाराव भालेराव यांच्या जन्मांची नोंद करावी.

३ अर्जदाराने कायदयाप्रमाणे दंड फी भरावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SHUBHANGI MUKUNDRAO JOSHI
Date: 2022.11.30 13:57:12 +0530

दिनांक : ३०.११.२०२२ (एस.एम.जोशी)
ठिकाण : बीड ७वे न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, बीड.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 30.11.2022 |
| Transcribed on | : | 30.11.2022 |
| Checked and Singed on | : | 30.11.2022 |

Sd/-
M.A.Kulkarni,
Stenographer Grage-III

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 15.01.2022 |
| Transcribed on | : | 15.01.2022 |
| Checked and Singed on | : | 15.01.2022 |

SD/-.
M.A.Kulkarni.
Stenographer Grade-3